बीड । मंगळवार
०१.०७.२०२५
वर्षे : ५ अंक : ९१
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● https://marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 पान:१

# बीड नगरपालिकेच्या नप फंडाची पालकमंत्री अजित दादांनी चौकशी लावावी

## जानेवारी ते मार्च दरम्यान २५ कोटींची बिले काढली

## कार्यकारी अभियंता किरण देशमुख यांची मेहरबानी





**बीड । प्रतिनिधी**

बीड नगरपालिकेत गुत्तेदारी करणारे खरे गुत्तेदार कामे करूनही वेळेवर बिल मिळत नसल्याने कर्जबाजारी झाले आहेत तर दुसरीकडे अधिकारीच गुत्तेदार झाल्याने हे सर्व तुपाशी आले आहेत. जानेवारी २०२५ ते मार्च २०२५ या आर्थिक वर्षा दरम्यान बीड नगरपालिकेच्या वतीने शहरातील विविध विकास कामांचे नगरपालिका फंडातून काढलेले बिल २५ कोटीच्या घरात आहेत. हे बिल काढताना कोणत्या व कशाप्रकारे या नगरपालिका फंडाची वाट लावण्यात आली याची चौकशी होणे गरजेचे झाले आहे. बीड नगरपालिकेच्या काढलेल्या सर्व बिलांची चौकशी करत शासकीय यंत्रणेद्वारे आर्थिक ऑडिट करण्यात यावे. उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित दादा पवार बीड नगरपालिकेत चाललेल्या बोगसगिरी विरोधात चौकशीचे आदेश देतील काय ? बीड शहरातील रस्त्यांची नाली व विकासाची जबाबदारी असणारे बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता किरण देशमुख यांनी मजूर सोसायटीच्या नावे काढलेल्या बिलांची फ र तपासणी करण्यात यावी. मागील आठ दिवसापूर्वी तीन कोटींचे नगरपालिका फंडातून केलेल्या कामांची बिले काढण्यात आली. यामध्ये दीड कोटी रुपयांची बोगस बिले काढली असल्याची चर्चा शहरात जोर धरू लागली आहे. नगरपालिकेने काढलेल्या सर्व मजूर संस्थांच्या बिलाची विशेष ऑडिट करण्याची मागणी पुढे येत असून कार्यालयात न येणारे कार्यकारी अभियंता किरण देशमुख यांच्या खाजगी कार्यालयातून सुरू असलेल्या विशेष स्वाक्षरी मोहिमाची तपासणी केल्यास अनेक प्रकरणे प्रकाश झोतात येतील.

बीड नगरपालिकेत प्रशासन राज सुरू झाल्यापासून नगरपालिकेच्या हक्काच्या नफ फंडातून बीड शहरात विविध विकास कामांना मंजुरी देण्यात आली. हे काम करताना अनेक ठिकाणी बोगस कामे झाल्याची चर्चा होते मात्र बिले काढताना यामध्येही मोठा भ्रष्टाचार झाला असल्याची चर्चा जोर धरत आहे. नगरपालिकेने जानेवारी २०२५ ते मार्च २०२५ दरम्यान नगरपालिकेच्या फंडातून २५ कोटी रुपयांची बिले काढली यामध्ये मोठा आर्थिक घोटाळा झाल्याची चर्चा आहे. विशेष म्हणजे मागील आठ दिवसात नप खंडातून तब्बल तीन कोटी रुपयांची बिले मंजूर करण्यात आली व वाटपही करण्यात आली. या तीन कोटी रुपयांच्या बिलात तब्बल दीड कोटी रुपयांची बोगस बिले काढली असल्याची चर्चा आहे. बीड नगरपालिकेचा बांधकाम विभाग किरण देशमुख नावाच्या कार्यकारी अभियंता कडे आहे मात्र हे महाशय कार्यालयात कमी व खाजगी कार्यात जास्त असतात. बीड शहरात झालेल्या विविध ▶▶ उर्वरित पान २ वर

## बीडमध्ये महिलांनी काढला कॅन्डल मार्च

### अल्पवयीन मुलीच्या लैंगिक शोषण प्रकरणी नागरिकांमधून संताप



**पीडितेला न्याय मिळेपर्यंत संघर्ष चालू राहणार**

**आरोपींना मदत करणाऱ्या व्यक्तींना सहआरोपी करण्यात यावे. प्रकरणाच्या सखोल चौकशीसाठी विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करावी. चौकशी महिला आयपीएस अधिकाऱ्यांकडूनच करण्यात यावी. पीडितेला न्याय मिळेपर्यंत संघर्ष चालू ठेवला जाईल, अशी भूमिका आंदोलनकर्त्यांनी घेतली.**

**बीड । प्रतिनिधी**

शहरात अल्पवयीन मुलीच्या लैंगिक छळप्रकरणी संतप्त नागरिकांनी सोमवारी (दि.३०) सायंकाळी ७ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरात कॅन्डल मार्च काढून निषेध व्यक्त केला. यावेळी सर्वस्तरातील म हिला, युवती व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. हातात कॅन्डल्स व मागण्यांचे फलक घेत सहभागी महिलांनी मुलगी आहे, अबला नाही, अत्याचाऱ्यांना ▶▶ उर्वरित पान २ वर

## धनंजय मुंडे यांनी घेतली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांची भेट

### अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार प्रकरणी महिला आयपीएस अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली एस आय टी स्थापन करण्याची पत्राद्वारे मागणी

- मुख्यमंत्री सकारात्मक; बीड प्रकरणाचा तपास महिला आयपीएस अधिकाऱ्यामार्फत होणार!
- आरोपींनी राजकीय पाठबळावर अनेक गुन्हे लपवले, ते समोर येणे गरजेचे - धनंजय मुंडे

**मुंबई । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी आज बीड शहरात अल्पवयीन मुलीवर झालेल्या लैंगिक अत्याचार प्रकरणी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांची विधानभवन मुंबई येथे भेट घेऊन या प्रकरणात बीड जिल्हा बाहेर सेवेत असलेल्या एका अनुभवी आय पी एस दर्जाच्या महिला पोलिस अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली विशेष तपास पथक (SIT) स्थापन करून स्वतंत्र चौकशी करून न्याय मिळवून देण्याची मागणी पत्राद्वारे केली आहे. बीड शहरातील उमाकिरण संकुलात आरोपी विजय पवार व प्रशांत खटोकर ▶▶ उर्वरित पान २ वर



## प्रशासन आता गावात आले आहे , समस्या सांगा - उत्तर मिळेल : तहसीलदार शेळके



**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील समनापुर येथे पाली महसूल मंडळातील गावांसाठी महसूल विभागाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज म हाराजस्व समाधान शिबिर सोमवार दि ३० जून रोजी राबविण्यात आले . जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन , अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक , उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सोमवारी सकाळी आयोजित करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके हे होते . नायब तहसीलदार प्रशांत जाधवर , सुरेंद्र डोके , नायब तहसीलदार अण्णासाहेब वंजारे , मंडळ अधिकारी सतीश बांगर , अव्वल कारकून राहुल कसबे , अमोल कणसे , महेंद्र राऊत , कोल्हारवाडी दत्त संस्थांनचे मठाधीपती श्रीहरी पवार महाराज उपस्थित होते . या कार्यक्रमाचे आयोजन पाली महसूल मंडळाच्या मंडळ अधिकारी शीतल चाटे व पाली महसूल मंडळातील सर्व ग्राम महसूल अधिकारी यांनी केले होते. या कार्यक्रमात उपस्थितांना मार्गदर्शन करताना तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी महसूल विभागाच्या विविध योजनांविषयी माहिती दिली . यामध्ये जिवंत ▶▶ उर्वरित पान २ वर

## बीड जिल्हा अन्याय, अत्याचारग्रस्त म्हणून घोषीत करा : अनिल तुरुकमारे



बीड पोलीस अधिक्षक नवनीत कांवत हे लोकनेते गोपीनाथराव मुंडे मागासवर्गीय सुतगीरणी केज दोषी विरुध्द गुन्हा दाखल करण्याचे आदेश देण्यास टाळाटाळ, आझाद मैदान मुंबई येथे उपोषण धरणे

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात नवनीत कावत हे पोलीस अधिक्षक म्हणुन पदभार घेतल्या पासुन आज पर्यंत बीड जिल्ह्यात गुन्हेगारीचे प्रमाण वाढले असुन महिला वरील अन्याय अत्याचारात वाढ झालेली आहे. पोलीस अधिक्षक हे पोलीस अधिक्षक कार्यालयात बसुन फक्त आदेश देण्याचे काम करीत आहेत, अनुचीत प्रकार घडल्यास ते तात्काळ भेट देत नाहीत त्यामुळे गुन्हेगारी प्रवृत्ती वाढत चालली आहे. अनुसुचित जाती ▶▶ उर्वरित पान २ वर

## शेत रस्त्यासाठी परळीत शेतकऱ्याचा तहसील कार्यालयासमोर आत्मदहनाचा प्रयत्न



**परळी वै. । प्रतिनिधी**

आपल्या शेतजमिनीकडे जाणारा रस्ता खुला करून मि ळावा, या मागणीकडे प्रशासनाने वारंवार दुर्लक्ष केल्याने संतप्त झालेल्या एका शेतकऱ्याने परळी तहसील कार्यालयासमोर अंगावर डिझेल ओतून आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. ज्ञानेश्वर उद्धव दहीफळे असे या शेतकऱ्याचे नाव असून, उपस्थित नागरिक आणि पोलिसांच्या सतर्कतेमुळे म ोठा अनर्थ टळला. या धक्कादायक प्रकारामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

तालुक्यातील मौजे सिरसाळा येथील गट क्रमांक ३९० मध्ये ज्ञानेश्वर दहीफळे यांची शेती आहे. मात्र, शेताकडे जाणारा पारंपरिक रस्ता अडवण्यात आल्याने त्यांना शेतीची मशागत करणे अशक्य झाले आहे. यामुळे जमीन पडीक पडून त्यांच्या कुटुंबावर उपासम ारीची वेळ आली आहे.

याप्रकरणी त्यांनी १८ मार्च २०२४ रोजी तहसील कार्यालयात रस्ता खुला करण्यासाठी अर्ज दिला होता. मात्र, अनेक महिने उलटूनही प्रशासनाने कोणतीही दखल घेतली नाही. अखेर, ३० जून रोजी कुटुंबासह आत्महत्या करण्याचा इशारा त्यांनी दिला होता. दिलेल्या इशाऱ्यानुसार दहीफळे यांनी आज सोमवारी (दि.३०) तहसील कार्यालयासम ोरच अंगावर डिझेल ओतून आत्म दहनाचा प्रयत्न केला. ▶▶ उर्वरित पान २ वर

## उमाकिरण प्रकरणी पीडित असल्यास संपर्क साधण्याचे पोलीस विभागाचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा पोलीस दला तर्फे सर्व जनतेस जाहिर अहवाल करण्यात येते की, उमा किरण शैक्षणीक संकुल बीड येथे झालेल्या गैर प्रकारा बददल पोलीस ठाणे शिवाजी नगर बीड येथे दिनांक २६/०६/२०२५ रोजी गुन्हा दाखल झालेला आहे. सदर प्रकरणा बाबत आणखी कोणी पिडीत असेल किंवा कोणाला काही माहिती । पुरावे सादर करावयाचे असतील तर त्यांनी मा. पोलीस अधीक्षक बीड किंवा तपासणी अधिकारी पोलीस निरीक्षक पो.स्टे. शिवाजी नगर बीड यांना प्रत्यक्ष भेटावे किंवा ▶▶ उर्वरित पान २ वर






# लोकनेते विनायकराव मेटे यांच्या जयंती निमित्त अभिवादन करण्यास जनसागर लोटला

## • जड अंत:करणाने उपस्थितांनी केली श्रद्धांजली अर्पण



लोकनेते विनायकराव मेटे यांची जयंती दि. ३० जून सोमवार रोजी त्यांच्या आठवणींना उजाळा देत साजरी करण्यात आली. सकाळपासूनच अभिवादनासाठी चाहत्यांनी मोठी गर्दी केली होती. सकाळी ११ वाजता सामुदायिक अभिवादन कार्यक्रम बीड येथील लोकनेते विनायकराव मेटे स्मृतीस्थळी पार पडला यावेळी सामाजिक ,राजकीय क्षेत्रातील मान्यवरांसह , शिवसंग्रामचे कार्यकर्ते, पदाधिकारी आणि मेटे साहेबांवर प्रेम करणारे असंख्य चाहते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिवसंग्रामचे संस्थापक अध्यक्ष दिवंगत विनायकराव मेटे साहेब यांच्या जयंती निमित्त त्यांचे स्मरण व्हावे यासाठीआज सकाळपासूनच गावो - गावी अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले होते वस्ती , वार्ड, तांड्यावर त्यांना अभिवादन करत जयंती साजरी करण्यात आली. गावातील ग्रामपंचायत कार्यालय, सामाजिक सभागृह, वाचनालय या ठिकाणी नागरिकांच्या वतीने त्यांना अभिवादन करण्यात आले .तर बीड येथील त्यांच्या स्मृतीस्थळी त्यांना सर्वपक्षीय सामुदायिक अभिवादन करण्यात आले.

लोकनेते विनायकराव मेटे हे फक्त जिल्ह्याचे नेते नसून त्यांनी उभ्या महाराष्ट्र भर आपल्या सामाजिक कार्यातून दीनदलित, उपेक्षित, वंचित यांना न्याय मिळवून देण्याचे काम केले होते. त्यांच्या कार्याची गणना करणे अशक्य आहे. सामूहिक विवाह सोहळ्यातून त्यांनी अनेकांची संसार थाटले , कोविड काळात सर्वसामान्यांना मदतीचा हात दिला, दुष्काळात शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीर पने उभा राहिले, व्यसमुक्तीसाठी लढा उभा केला , युवकांसाठी रोजगार मेळावे आयोजित केले. लोकनेते विनायकराव मेटे यांनी आपली उभी हयात समाजासाठी अर्पण करत समाजाच्या लढ्यासाठी घालवली. मराठा , मुस्लिम , धनगर आरक्षण मिळावे या मागणीसाठी त्यांनी जीवाची पराकाष्टा केली आपण शेवटच्या श्वासापर्यंत मराठा आरक्षण लढा चालू ठेवणार अशी भीष्म प्रतिज्ञा त्यांनी केली होती आणि त्यांचा शेवटही मराठा आरक्षणावर होवू घातलेल्या मुंबई येथील बैठीकाला जाताना झाला. या लढवय्या नेत्याच्या जाण्याने समजा पोरका झाला आहे. अशा बहु आयामी लोकनेत्याला समाज कधीच विसरणार नाही. अशी भावना उपस्थित व्यक्त करत होते. यावेळी अनेकांना आपल्या भावना अनावर झाल्या अत्यंत जड अंतः करणाने उपस्थितांनी श्रद्धांजली अर्पण केली. या प्रसंगी शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे, शिवसंग्राम प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर कोलंगडे, अशोक हिंगे, दिलीप गोरे, नारायणराव काशिद, प्रा. सुभाष जाधव, राजेंद्र मस्के, उल्हास गिरम,उ बी.बी.जाधव, अनिल घुमरे, रमेश चव्हाण, डॉ.प्रमोद शिंदे, राजाभाऊ मोहाले, नारायणराव थोरात, निवृत्ती डोके, तुळशीराम पवार, उत्तम पवार, ज्ञानेश्वर चौधरी, पंडित माने, प्रमोद कुलकर्णी महेश वाघमारे, संजय पवार, गोरख शिंदे, राजेश भुसारी, भास्कर गायकवाड, उदय जोगदंड, सुनील शिंदे ,बाळासाहेब खोसे,नवनाथ प्रभाळे, बाबासाहेब पाटील, लिंबराज वाघ, दोडके फैजी आदी सह शिवसंग्रामचे कार्यकर्ते पदाधिकारी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### ६२ रक्तदात्याने केले रक्तदान

**लोकनेते विनायकराव मेटे साहेब यांच्या जयंती निमित्त बीड येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अशोक हिंगे, संजय पवार, अतुल लंगोरे आणि सुशील कांबळे यांनी रक्तदान करून शिबिराची सुरवात केली. या शिबिरात एकूण ६२ रक्तदात्यांनी रक्तदान करून मेटे साहेबांना श्रद्धांजली अर्पण केली.**

## पान १ वरून पुढे...

### बीड नगरपालिकेच्या...

विकास कामात खरे गुत्तेदार यांच्यावर सतत अन्याय होत असून केलेल्या कामांचे देयक देण्यास नगरपालिका अडचण निर्माण करत असून अधिकारी व कर्मचारी ज्या संस्थेच्या व मजूर संस्थेच्या नावाने कामे करून घेतात त्यांना मात्र भरघोस निधी तात्काळ दिला जात आहे. यामध्ये एका वरिष्ठ अधिकाऱ्याच्या मनमर्जीप्रमाणे चाललेल्या कारभाराचा फटका छोट्या गुत्तेदारांना बसत आहे. बीडचे पालकमंत्री अजित दादा बीड नगरपालिकेत सुरू असलेल्या प्रचंड बोगसगिरी व भ्रष्टाचाराची चौकशी करतील काय? बीड नगरपालिकेत सतत सुरू असलेल्या बोगसगिरीचा व खाबोगरीचा फटका शहरातील जनतेला बसत आहे विकास कामे न करताच अनेक ठिकाणी नगरपालिकेच्या हक्काचा फंड अधिकाऱ्यांच्या घशात घातला जात आहे. बीड नगरपालिकेत बांधकाम विभागात कार्यकारी अभियंता पदावर असणारे किरण देशमुख यांनी तर बिले काढण्यात पीएचडी केली आहे का ? नगरपालिकेतील अंदाजपत्रकाची बिले काढताना खाजगी कार्यालयाचा वापर कार्यकारी अभियंता किरण देशमुख नेहमीच करतात. किरण देशमुख यांच्या संपत्तीची चौकशी इडीमार्फत करावी बीडचे पालकमंत्री अजित दादा बीडच्या नगरपालिकेकडे लक्ष देतील काय ?

### बीडमध्ये महिलांनी...

माफी नाही; बीड जागं झालं, न्यायासाठी उभं राहिलं; नराधमांनो, चुकीला माफी नाही आणि एसआयटी स्थापन झालीच पाहिजे अशा घोषणांनी परिसर दणाणून टाकला. या कॅंडल मार्चच्या माध्यमातून केवळ नराधम आरोपीच नाही, तर त्यांना पाठीशी घालणाऱ्या लोकप्रतिनिधींचाही निषेध करण्यात आला. ठोस कारवाई न झाल्यास मोठे आंदोलन करण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला. यावेळी सर्वस्तरातील महिला, कार्यकर्त्यांसह नागरिकांची उपस्थिती होती. राष्ट्रगीताने कॅण्डल मार्चचा समारोप झाला.

### धनंजय मुंडे...

यांनी अल्पवयीन मुलीवर केलेल्या लैंगिक अत्याचार प्रकरणी दोन्ही आरोपींना पोलिसांनी वैद्यकीय रजेवर व अन्य तालुक्यात नियुक्त असलेल्या अधिकाऱ्यामार्फत नाट्यमय रित्या अटक केली असून, या प्रकरणात सुरू असलेला तपास समाधानकारक नाही, तसेच याप्रमाणे अनेक मुलींचे लैंगिक शोषण या नराधमांनी केले असून त्यांना असलेल्या स्थानिक राजकीय पाठबळामुळे इतर पीडित मुली तक्रार द्यायला धजावत नाहीत, तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या दबावातून या आरोपींना वाचवण्याचे काम केले जाऊ शकते, त्यामुळे या प्रकरणात पीडितांना न्याय मिळवून देण्यासाठी एका महिला आय पी एस अधिकारी यांच्यामार्फत स्वतंत्र निष्पक्ष चौकशी होणे गरजेचे असल्याचे धनंजय मुंडे यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे. या प्रकरणी तपासात डिजिटल पुरावे गोळा करणे ही प्राथमिकता होती, मात्र आरोपी, त्यांचे नातेवाईक, मदत करणारे यांचे सीडीआर, आयपीडीआर, व्हॉटसअप चॅट, इन्स्टा, चॅट, प्रायव्हेट कॉलिंग, मोबाईल डेटा मधील व्हिडिओ, फोटो, व्हॉटसअप कॉल, फेस टाईम कॉल यांपैकी पोलिसांनी अद्याप काहीही ताब्यात घेतले नसल्याची माहिती आहे, तसेच संकुलात असलेल्या सीसीटीव्ही फुटेज मध्ये १३ जून पूर्वीचे फुटेज उपलब्ध नाही, अशा अनेक त्रुटी पोलीस तपासात दिसून येत असल्याचा उल्लेखही धनंजय मुंडे यांनी केला आहे. या प्रकरणातील पीडिता व तिच्या कुटुंबीयांना स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या निकटवर्तीयकडून धमकावले जात असून तक्रार मागे घेण्यासाठी दबाव आणला जात आहे, अशाच प्रकारच्या दबावामुळे इतर पीडित मुली समोर येऊन तक्रार द्यायला धजावत नाहीत, असेही मुंडेंनी आपल्या पत्रात म्हटले आहे. दरम्यान संबंधित आरोपींपैकी विजय पवार यांच्याकडे कोट्यवधी रुपयांची मालमत्ता असून, ते स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या सोबत अनेक व्यवहार एकत्र करतात, बेनामी जमिनी, प्लॉट, रेड झोन मध्ये खाजगी शाळेचे बांधकाम असे अनेक काळे कारनामे यांनी संगनमताने केले असून याचीही चौकशी होणे गरजेचे आहे. दरम्यान पवार व त्याच्या गँग ने कोचिंग क्लासेस च्या माध्यमातून विद्यार्थ्यांकडून हजारो रुपयांची फी वसुली केलेली आहे. तसेच वेळेत फी भरू न शकलेल्या गरीब कुटुंबातील मुलींना टार्गेट केले आहे. क्लासेस च्या नावाखाली केली जाणारी ही आर्थिक लूट थांबावी, यासाठी बीडच नव्हे तर सबंध राज्यातील कोचिंग क्लासेस चालकांना फी मर्यादा, वसुली, विद्यार्थ्यांची सुरक्षा यांसारख्या कायदेशीर व नैतिक संहिता लागू करण्यासाठी एक धोरण निश्चित केले जाऊन तशी नियमावली निर्गमित केली जावी, अशी मागणी देखील धनंजय मुंडे यांनी केली असून, अशी मागणी करणारे धनंजय मुंडे हे पहिलेच लोकप्रतिनिधी ठरले आहेत! दरम्यान धनंजय मुंडे यांच्या मागणीचा सकारात्मक विचार करून लवकरच योग्य निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी दिले आहे.

### प्रशासन आता...

सातबारा मोहीम , फार्मर आय डी , श्रावण बाळ योजना , संजय गांधी निराधार योजना डी बी टी करणे , नकाशावरील शेत रस्ते मोकळे करणे , त्यामुळे निर्माण होणारे वाद आपापसात सामंजस्याने मिटवून घेणे तसेच उपस्थितांना फार्मर आयडीचे महत्त्व त्यांनी पटवून सांगितले . आपल्याला फार्मर आयडीमुळे विविध योजनांचा लाभ घेता येईल , यामध्ये महसूल विभागाच्या सर्व योजना असतील , कृषी विभागाच्या योजना असतील तसेच इतर योजना असतील, याला फार्मर आयडी कंपल्सरी केलेला आहे . फार्मर आयडीमुळे शेतकऱ्यांची माहिती डिजिटल स्वरूपात साठवली जाईल , ज्यामुळे त्यांना कागदपत्रांकरीता हेलपाटे मारण्याची गरज पडणार नाही . तसेच त्यांनी उपस्थितांना जिवंत सातबारा मोहिमेचा जास्तीत जास्त उपयोग करून घेण्याचे आवाहन केले व जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी नोंदणी करून आपापला फार्मर आयडी काढून घेण्याचे देखील आवाहन केले. या कार्यक्रम प्रसंगी नायब तहसीलदार प्रशांत जाधवर यांनी संजय गांधी निराधार योजना , श्रावण बाळ योजना विषयी माहिती दिली. महसूल विभागाविषयी कोणत्याही अडचणी आपल्याला आल्यास अशा अडचणी सोडवण्यासाठी महसूल विभाग कटीबद्ध असल्याचे नमूद केले . यावेळी नायब तहसीलदार सुरेंद्र डोके यांनी आपले मनोगत व्यक्त करताना महसूल प्रशासन वेळोवेळी शासनाने राबवलेल्या योजनांची माहिती शेतकऱ्यापर्यंत पोहोचत असते , तसेच शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी आमचे ग्राम महसूल अधिकारी व संपूर्ण महसूल विभाग कटिबद्ध आहे असे सांगितले . मंडळ अधिकारी शीतल चाटे यांनी पाली मंडळ अंतर्गत उपस्थित ग्रामस्थांना मार्गदर्शन करताना जिवंत सातबारा मोहिमेचे महत्त्व समजून दिले तसेच शेतकऱ्यांना महसूल विभागाशी निगडित कोणत्याही अडचणीसाठी महसूल विभागाचे कर्मचारी सदैव तत्पर आहेत अशी ग्वाही दिली . या कार्यक्रमामध्ये उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विविध लाभार्थ्यांना विवाह नोंदणी प्रमाणपत्र , रहिवासी दाखले जातीचे प्रमाणपत्र , सहा क प्रमाणपत्रे , श्रावण बाळ लाभ प्रमाणपत्र , संजय गांधी निराधार योजना लाभ प्रमाणपत्र , कृषि विभागाच्या वतीने बियाणे इत्यादींचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास दत्त संस्थान कोल्हारवाडीचे पवार महाराज ,आहेर वडगाव चे सरपंच सुशेन खरसाडे , कोल्हारवाडीचे सरपंच अशोक शिंघन , समनापूर सरपंच बाबु गोरे , दीपक हजारे , चंद्रसेन गोरे , कोळवाडी चे सरपंच तुळशीदास महाराज शिंदे , तुषार शेळके , गिरजाप्पा घाडगे , अक्षय घाडगे , शिवलाल शिंदे , अक्षय पवार ,आहेर वडगाव चे पोलीस पाटील सखाराम काटे , बाबासाहेब रांजवन सर , पाली महसूल मंडळ अंतर्गत ग्राम महसूल अधिकारी अनिल गायकवाड , मीनल खांदे , राधिका बहिर , जितेंद्र शेळके , विलास उबाळे , कृषी सहायक सरिता शिंदे , इत्यादी उपस्थित होते. तसेच पाली महसूल मंडळातील शेतकरी बहुसंख्येने उपस्थित होते . त्याचबरोबर मंडळातील सीएससी चालक तसेच पाली महसूल मंडळातील शेतकरी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते .

### बीड जिल्हा....

जमाती मधील महिला यांच्यावर मारहाणीचे प्रकार, विनयभंगाचे प्रकार, जातीवाचक शिवीगाळीचे प्रकार घडले आहेत गुन्हा दाखल होऊन ही या प्रकरणी त्यांनी तात्काळ कार्यवाही न करता दुर्लक्ष केल्यामुळे महिलांच्या अन्याय अत्याचारात वाढ होत आहे. अकार्यक्षम पोलीस अधिक्षक नवनीत कावत यांची बदली मुंबई येथील पोलीस मुख्यालयाच्या नियंत्रण कक्षात करण्यात यावी. तसेच लोकनेते गोपीनाथराव मुंडे मागासवर्गीय सुतगीरणी केज यांचे मुख्य प्रवर्तक माजी आमदार संगीता ठोंबरे, चेअरमन विजयप्रकाश ठोंबरे, तत्कालीन जात पडताळणी सदस्य सचिव रविकांन्त मारुती शिंदे बीड, राजकुमार दयाराम व्हावळे या सर्वांनी संगनमत करुन महाविद्यालयात शिकणारे विद्यार्थी, विद्यार्थीनी तसेच काही नौकरीदार यांचे जात वैद्यता प्रमाणपत्र जात पडताळणी विभागाकडुन चुकीच्या पध्दतीने हस्तगत करुन लोकनेते गोपीनाथराव मुंडे मागासवर्गीय सुतगीरणीचे परस्पर सभासद दाखवले आहेत. त्यात माझा मुलगा ऋषीकेश अनिल तुरुकमारे याचा ही समावेश आहे. या बाबत मा. मुख्यमंत्री, गृहमंत्री, गृहसचिव, पोलीस महासंचालक, विशेष पोलीस महासंचालक संभाजीनगर इत्यादी ठिकाणावरुन चौकशी करण्याचे आदेश पोलीस अधिक्षक यांना देण्यात आले होते. मा. पोलीस अधिक्षक बीड यांनी अप्पर पोलीस अधिक्षक तिडके मॅडम, अंबाजोगाई यांच्या अधिपत्याखाली विशेष चौकशी समिती नेमण्यात आली. सदर चौकशी समीतीने चौकशी करुन अडीच महिन्यापुर्वी पोलीस अधिक्षक बीड यांना अहवाल सादर केला आहे. परंतु पोलीस अधिक्षक बीड हे चौकशी अहवालाप्रमाणे कार्यवाही करण्याचे आदेश देण्या ऐवजी किरकोळ मुद्दे काढुन फेरचौकशी चे आदेश काढले आहेत. चौकशी समिती अहवालाप्रमाणे कार्यवाही करणे वजी संबंधीत सुतगीरणीच्या दोषींना वाचविण्यासाठी फेर चौकशीचे आदेश काढले आहेत असे स्पष्ट दिसते. चौकशी समिती अहवाला प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी यासाठी मा. पोलीस अधिक्षक यांना अनेकवेळा भेट देवुन विनंती केली परंतु संबंधीता विरुध्द गुन्हा दाखल करण्याचे आदेश देण्याचे टाळाटाळ करत आहेत तसेच सुतगीरणीचे मुख्यप्रवर्तक, चेअरमन व दोषी अधिकारी यांना पाठीशी घालण्याचे काम पोलीस अधिक्षक बीड हे करीत आहेत, तरी सदरील सुतगीरणी प्रशासना विरुध्द तात्काळ अप्पर पोलीस अधिक्षक अंबाजोगाई यांच्या चौकशी अहवाला प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात यावा व बीड जिल्हा अन्याय आणि अत्याचारग्रस्त घोषीत करण्यात यावा या मागणीसाठी आज १ जुलै २०२५ पासुन आझाद मैदान मुंबई या ठिकाणी धरणे उपोषण सुरु केले आहे.

### शेत रस्त्यासाठी...

सुदैवाने, घटनास्थळी उपस्थित नागरिक आणि पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करून दहीफळे यांना रोखले आणि त्यांना ताब्यात घेतले. या घटनेमुळे प्रशासकीय दिरंगाईचा आणि शेतकऱ्यांच्या समस्यांकडे होणाऱ्या दुर्लक्षाचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. रस्ता मिळाल्याशिवाय शेती करणे शक्य नाही. प्रशासनाने वेळेवर निर्णय न घेतल्यास आमच्यासारख्या शेतकऱ्यांना आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलावे लागते. याला तहसीलदार, तलाठी व मंडळ अधिकारी जबाबदार आहेत.

### उमाकिरण प्रकरणी...

खालील दिलेल्या मोबाईल नंबर वर निर्भिड पणे सादर करावे. माहिती व पुरावे सादर करणारे इसमांची नावे गोपनीय ठेवण्यात येतील. संपर्कासाठी मोबाईल नंबर- नवनीत काँवत, पोलीस अधीक्षक, बीड मो.न. ९२२५०९२८००, के.एस. पवार, पोलीस निरीक्षक पोलीस ठाणे शिवाजी नगर बीड मो.न. ९२२५०९२८११

## पान ४ वरून पुढे...

### शिवसेना बांधकाम...

शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली राज्यभरात पुन्हा एकदा पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करुन शिवसेनेला बळ देण्याचे काम सुरु आहे. शिवसेनेमध्ये युवकांना पद देऊन मानाचे स्थान देण्यात येत आहे. बांधकाम कामगारांच्या न्याय हक्कासाठी लढणाऱ्या शिवसेना बांधकाम कामगार सेनेच्या जिल्हाध्यक्षपदी रवी मुडेगावकर यांची निवड करण्यात आली. परळी व केज/ अंबाजोगाई विधानसभा क्षेत्राची जबाबदारी मुडेगावकर यांच्यावर सोपविण्यात आली आहे. याबद्दल शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी मुडेगावकर यांचे स्वागत केले आहे.

### महामार्गावरील अतिक्रमणे...

ठिकाणी राहणाऱ्या लोकांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत आहेत. ते दुरुस्ती करण्यात यावे. राष्ट्रीय महामार्ग खात्याचे स्वतंत्र ऑफिस बीड जिल्ह्यात होण्यासाठी आर.ओ ऑफिसला प्रस्ताव पाठवा, अशा सुचना देखील दिल्या. राष्ट्रीय महामार्ग संस्थेचे स्वतंत्र कार्यालय बीडला झाल्यास जिल्ह्यातील कामे वेळेत मार्गी लागतील, अशी अपेक्षाही यावेळी त्यांनी व्यक्त केली. खरवंडी-मादळमोही-पाडळसिंगी -गढी- माजलगाव या महामार्गावरील तालखेड फाटा, शृंगारवाडी फाटा व इतर सर्व ठिकाणी रस्ते कामाचा दर्जा अत्यंत खराब असल्यामुळे अपघात होत असले बाबत तक्रारी होत आहेत. भविष्यात अपघात होऊ नयेत यासाठी आवश्यक त्या सुधारणा करण्यात याव्यात, असेही म्हटले.

### तलवाडा येथील...

की तलवाडा ग्रामपंचायत ला प्रशासक म्हणून काम पाहत असलेलें चोपडे साहेब व ग्राम विकास अधिकारी मुसळे यांनी मलिदा पायी बोटावर मोजण्या इतक्या लोकांना गाव तलाव भराव भिंतीच्या लगट कोरून अतिक्रमण करावे लावले का? मागील विस पंचवीस वर्षापासून ज्यांच्या ताब्यात ग्रामपंचायत होती त्यांनी पण बरीच गायराण जमीनीवर ताबा केला व आपल्या मालकीची केली. ग्रामपंचायतला पी टी आर देण्याचा अधिकार कोणी दिला ? असा प्रश्न निवेदनात उपस्थित केला गेला असुन गाव तलावाची संरक्षण भीत खुले आम कोरून अँगल पत्राचे शेड या ठिकाणी मारलेले असुन काहींनीतर पक्के आर सी सीचे बांधकाम केले तहसीलदार च्या दुर्लक्षपणामुळे भविष्यात गाव तलाव फुटण्याचा गावास धोखा आहे. विशेष म्हणजे या बांधकामाखालून तलवाडा येथील सार्वजनिक बारव विहीर, वरून होणारी पाणी पुरवठा करणारी पाईप लाईन आहे. तसेच जायकवाडी वसाहत या ठिकाणी सुद्धा पाणी पुरवठा करणारी पाईप लाईन आहे या दोन्ही पाईप लाईन बंद झाल्याने नागरिकांना पाणी पुरवठा करण्यासाठी अडथळा निर्माण होत आहे. जिल्हाधिकारी साहेब यांनी गाव तलाव वाचवण्यासाठी तात्काळ अतिक्रमण काढून शासनाच्या आदेश नसताना ज्यांनी ज्यांनी पी टी आर दिले त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी नसता स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल याची नोंद घ्यावी. आसे ही निवेदनात शेवटी शेख खिजर जैनोदीन सौदागर व जयदेव शिंगने यांनी म्हणटले आहे.

### बाजीराव दादा...

साहेब आणि पूर्वेशजी सरनाईक यांच्या सामाजिक जाणिवेतून. मंगेशजी चिवटे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली कार्य करणाऱ्या टीमने संपूर्ण व्यवस्थापन सुयोग्यरीत्या पार पाडले. शिबिरात विविध तज्ज्ञ डॉक्टरांच्या उपस्थितीत रक्तदाब, शुगर, हृदयाची प्राथमिक तपासणी आदी सुविधा मोफत उपलब्ध करून देण्यात आल्या. अनेक वारकऱ्यांनी हे आरोग्य शिबिर उपयोगी असल्याचे नमूद केले व आयोजकांचे मनः पूर्वक आभार मानले. उन्हाच्या तीव्र झळांमध्ये पिण्याच्या पाण्याची व अल्पोपहाराची सुविधा उपलब्ध करून देणे ही देखील वेळेची गरज होती, जी या शिबिराच्या माध्यमातून पूर्ण करण्यात आली. बाजीराव दादा चव्हाण यांचे सामाजिक कार्य बीड जिल्ह्याच्या सीमांपलीकडे पोहोवून महाराष्ट्राच्या विविध भागांतील जनतेपर्यंत पोहोचत आहे. समाजातील प्रत्येक घटकासाठी झटणारे त्यांचे कार्य प्रेरणादायी आहे. वारकऱ्यांसाठी आयोजित करण्यात आलेला हा उपक्रम त्यांच्या जनतेप्रती असलेल्या सेवाभावाची साक्ष देतो. या सेवाकार्यात स्थानिक कार्यकर्ते, वैद्यकीय पथक व स्वयंसेवकांनी मनापासून सहभाग घेतला. वारकऱ्यांचा ओघ पाहता, पुढील वर्षी हा उपक्रम आणखी मोठ्या स्वरूपात राबवण्याची तयारी असल्याचे आयोजकांनी सांगितले.

### गावंजी कापसे...

प्रा.गोगुले, प्रताप हाटोटे, सदाशिव तौर, संजय सुतार, मुख्याध्यापक वसंत राठोड, राजेंद्र जगदाळे, मुरलीधर पवार, प्रा.मासाळ, प्रमोद पंडित, सय्यद युनूस, शिवाजी पाटोळे, प्रा. मासाळ, अनंत डावकर, प्राचार्य डॉ. सरकटे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी कापसे यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सपत्नीक सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पर्यवेक्षक हरीभाऊ हाकाळे यांनी केले. याप्रसंगी मुख्याध्यापक राठोड, प्रमोद गोरकर, संतोष सुतार यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाला मच्छिंद्र रोकडे, संतोष सुतार, कमलाबाई हातागळे, निलेश भाकरे, विजय सुतार, बंडू सुतार, संजय सुतार, अमोल सुतार, मच्छिंद्र रोकडे, नंदू सुतार, कमलाकर हातागळे, रजनी सुतार यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### गोर गरिबांच्या....

अभिवादन कार्यक्रमात राजेंद्र आमटे बोलत होते. यावेळी पुढे बोलताना ते म्हणाले की, शेतकरी कर्ज माफी साठी सर्वात मोठा मोर्चा शेगाव येथे मेटे यांनी काढला. शेतकरी शेतमजूर पेन्शन योजना राबवण्यात यावी हि मुख्य भूमिका मेटे यांनी घेतली. मराठा समाजाला आरक्षण मिळावे, यासाठी सर्वात मोठ्या लढा दिला. सारथी संस्थेच्या स्थापनेत सिंहाचा वाटा उचलला, खुल्या प्रवर्गातील नोकर भरती वय मर्यादा वाढवायचं काम मेटे यांनी केले. सर्व सामान्य घरातून संघर्ष करून गोर गरिबांच्या लेकरासाठी आयुष्य वेचणारे एकमेव नेते होते, असे प्रतिपादन राजेंद्र आमटे यांनी केले. खांडे पारगाव येथे लोकनेते विनायकराव मेटे यांच्या जयंती निमित्त अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला. या वेळी विनायकराव मेटे यांच्या आठवणींना उजाळा देण्यात आला. या वेळी शिवसंग्राम शेतकरी आघाडी जिल्हाध्यक्ष राजेंद्र आमटे, हरिभाऊ आमटे, आत्माराम आमटे, महादेव आमटे, नवनाथ बापू, अनिल पाटील, सुनील आमटे, बाबासाहेब सुरवसे, बापुराव सपकाळ, लहू आमटे, संतोष आम टे, नवनाथ सोळुंके, ऋषिकेश आमटे, विष्णू वाघमारे, सुदाम ठोकळ सह आदी उपस्थित होते.

### मुलीवरील कोचिंग...

पिंक पथकाकडे असल्याने तो तपास व्यवस्थित होत नसल्याने त्यांच्याकडून तो तपास काढून आयपीएस महिला पोलीस अधिकाऱ्यांकडे देण्यात यावा तर सदर प्रकरणातील पिढीतेला न्याय मिळेल .

### बीड जिल्ह्यातील...

गारांना मास्क, हँडग्लोज, सेफ्टी शूज दिले पाहिजे, मात्र मागील अनेक वर्षांपासून ही अत्यावश्यक सुविधा कंत्राटदारांनी पुरवलेली नाही त्याची तात्काळ अंमलबजावणी करावी, नगरपरिषद बीड आस्थापनेतील कंत्राटी कामगारांना दिनांक एक जून २०२३ रोजी अयोग्य व बेकायदेशीरित्या कामावरून कमी केले त्यांना पगाराच्या व कामाच्या सलगतेसह पूर्ववत तात्काळ कामावर घेण्यात यावे या सर्व मागण्या येत्या पंधरा दिवसात पूर्ण कराव्यात अन्यथा ३० जून २०२५ रोजी जिल्ह्यातील सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषद / नगरपंचायत यांच्यावर शिस्तभंगविषयक कारवाईचा प्रस्ताव नगरपरिषद प्रशासन संचालनालयास सादर करावा, या प्रमुख मागणीसह इतर मागण्या पदरात पाडून घेण्यासाठी रोजंदारी मजदूर सेना केंद्रीय महासचिव तथा कामगार प्रतिनिधी भाई गौतम आगळे सर मराठवाडा अध्यक्ष तथा कामगार प्रतिनिधी भाई राजेश कुमार जोगदंड, जिल्हा सह आयुक्त नगरपरिषद प्रशासन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय बीड. यांच्या दालनासमोर दिनांक: ३० जून २०२५ रोजी सकाळी ११: ३० ते दुपारी ०१: ३० पर्यंत अर्धनग्न सत्याग्रह करून दुपारी ०३ वाजल्या पासून न्याय मिळेपर्यंत कार्यालयीन वेळेत धरणे आंदोलन करतील. होणाऱ्या सर्व अनुचित प्रकारास महाराष्ट्र शासन, प्रशासनातील सनदी अधिकारी जिल्हा प्रशासन व बीड जिल्ह्यातील सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषद / नगरपंचायत हेच जबाबदार राहतील असे दिलेल्या निवेदनात नमूद केले असून त्याच्या प्रतिलिपी संबंधित मंत्री महोदय व सनदी अधिकारी यांना ईमेल द्वारे पाठविण्यात आल्या आहेत, जिल्ह्यातील सर्व कंत्राटी कामगार वर्गाने स्वत:च्या न्याय मागण्यांसाठी अर्धनग्न आंदोलनात सामील व्हावे असे आवाहन प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाद्वारे संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष भाई राजेशकुमार जोगदंड यांनी केले आहे.

### चकलांबा येथील...

करण्यात आले. यावेळी नातेवाईकांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. जुन्या पिढीतील एक पान यांच्या रूपातून गळाले आहे. रोकडेश्वर भक्त असलेले रघुनाथ मामा अतिशय धार्मिक वृत्तीचे, वारकरी संप्रदायात रमलेले आणि गावातील प्रत्येक कार्यक्रमात मग तो धार्मिक कार्यक्रम असो, दिंडीचा कार्यक्रम असो, एखाद्या संताचा सप्ताह असो, की कोणतेही विधायक कार्य असो त्यात ते अग्रभागी असायचे. अतिशय मवाळ स्वभाव इतरांना मदत करण्याचा स्थायीभाव त्यांचा होता. अगदी सुरुवातीच्या काळात शेती बरोबरच त्यांनी टेलरिंग चा व्यवसाय केला. नोकरीच्या निमित्ताने आम्ही बाहेरगावी असलो तरी ज्या ज्या वेळी गावी जायचं त्यांची आवर्जून भेट व्हायची आणि अतिशय आस्तेवाईक पणे ते आमची चौकशी करत. सुस्वाभावी असलेले रघुनाथ मामा गेल्या काही दिवसापासून आजारी होते, त्यांच्यावरती उपचार चालू होते, दुर्दैवाने काल त्यांची प्राणज्योत मालवली. व गावातील सर्वांशी जिव्हाळ्याचे आणि आपुलकीचे संबंध असलेले एक व्यक्तिमत्व अनंताच्या प्रवासाला गेले. जेष्ठ नागरिक श्री बबनराव घाडगे यांचे ते ज्येष्ठ बंधू, डॉक्टर विजयकुमार घाडगे यांचे चुलते होते. त्यांच्या पश्चात पत्नी, अशोक व भारत दोन मुले तर विवाहित दोन मुली असून सुना, नातवंडे,जावई असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाने सर्व गावात हळहळ व्यक्त होत आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

**हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे,** E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

दैनिक
# मराठवाडा पत्र
● https://marathwadapatra.com
मंगळवार, दि.०१ जुलै २०२५ पान ४

## शिवसेना बांधकाम कामगार सेनेच्या बीड जिल्हाप्रमुख पदी रवी मुडेगावकर यांची नियुक्ती



बीड । प्रतिनिधी

बीड(प्रतिनिधी) शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व खा.श्रीकांत शिंदे यांच्या आदेशाने शिवसेना सचिव संजय मोरे साहेब यांच्या सूचनेवरून बांधकाम कामगार सेनेचे प्रमुख प्रीतम शेठ धारिया यांच्या संमतीने मराठवाडा प्रमुख विनोद नेमाडे यांनी शिवसेना संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे व जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांच्या शिफारशीवरून शिवसेना बांधकाम कामगार सेनेच्या परळी व केज/ अंबाजोगाई विधानसभा क्षेत्राच्या जिल्हाप्रमुखपदी रवी मुडेगावकर यांची नियुक्ती करण्यात आली. ▶▶ उर्वरित पान २ वर

# महामार्गावरील अतिक्रमणे काढा; अपघातस्थळी रुग्णवाहिका तातडीने पाठवा

### जिल्हा रस्ता सुरक्षा समितीच्या बैठकीत खा.बजरंग सोनवणे यांच्या अधिकाऱ्यांना सुचना

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यात विविध रस्त्यावर ब्लॅकस्पॉट आहेत. शिवाय राष्ट्रीय महामार्गावर अतिक्रमणे वाढत आहेत. यामुळे अपघात होत असून अपघात टाळण्यासाठी अतिक्रमणे काढा आणि अपघातस्थळी तातडीने रूग्णवाहिका पाठवा, अशा सुचना खा.बजरंग सोनवणे यांनी संबधित अधिकाऱ्यांना दिल्या.




जिल्हाधिकारी कार्यालयात सकाळी १२.३० वाजता जिल्हा रस्ता सुरक्षा समितीची बैठक आयोजीत केली होती. यावेळी खा.बजरंग सोनवणे बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रेहमान आणि विविध विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित होते. यावेळी बोलताना खा.बजरंग सोनवणे म्हणाले, अपघाताचे प्रमाण हे सायंकाळी व पहाटे जास्त असते. या दरम्यान आपल्या यंत्रणेने सतर्क राहायला हवे. जिल्ह्यात अनेक असे अतिक्रमण आहेत, ज्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढलेले आहे. ते अतिक्रमण काढण्याचा सूचना केल्या. विशेषत: गेवराई तालुक्यातील गढी भागात अनेक वेळा अपघात झालेले आहेत. त्या ठिकाणी तांत्रिक सुधारणा करण्याच्या सूचना केल्या. जिल्ह्यात कोठेही अपघात झाला तर त्या ठिकाणी रुणहिका तात्काळ मिळावी, यासाठी जिल्हा शल्यचिकित्सक यांना सूचना केल्या. माजलगाव तालुक्यातील सादोळा येथील पुलाचे काम तातडीने सुरू करावे असे म्हणत, लोकांची अडवणूक होणार नाही, याची काळजी घ्या, असा सल्लाही यावेळी त्यांनी दिला. दरम्यान, तेलगाव या ठिकाणी रस्त्याचे पाणी व्यवस्थित न काढल्यामुळे त्या ▶▶ उर्वरित पान २ वर

**● पालखी मार्गाचे काम निकषाप्रमाणे पुन्हा करावे**

**पैठण– पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग मधील डोंगरकिन्ही ते पारगाव घु.(अनपटवाडी) रस्त्याचा दर्जा अत्यंत खराब आहे. तसेच मळेकरवाडी घाटातील डांबरीकरणाचे काम वारंवार सूचना देऊनही अद्याप सुरु झालेले नाही. या रस्त्याच्या संपूर्ण कामात जागोजागी मोठ–मोठ्या भेगा पडलेल्या आहेत त्यामुळे रोज दुचाकी/चारचाकी वाहनांचे अपघात होत आहेत. पाटोदा शहरातील रस्ता काम अपूर्ण आहे. संपूर्ण रस्त्याचे काम अंदाजपत्रकातील निकषाप्रमाणे प्रमाणे पुन्हा करून घेण्यात यावे. एजन्सीवर आवश्यक ती कार्यवाही प्रस्तावित करावी. अतिरिक्त बाब या नावाने करण्यात आलेल्या अनावश्यक खर्चाची वरिष्ठ पातळीवरून चौकशी करण्यात यावी व जबाबदारी निश्चित करण्यात यावी, असे खा.सोनवणे यांनी म्हटले.**

**● 'टॉप फाईव्ह' विषयांना घातला हात...**

१. बीड जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्ग क्र.४५८ डी व ४५८ सी या रस्त्यावरील प्रमुख शहराभोवती नवीन बायपास/ओव्हर ब्रिजेस (अंबाजोगाई -केज- नेकनुर-मांजरसुंबा-पाटोदा व माजलगाव शहर) करणे. या रस्त्यावरील अपघात होत असलेल्या भागातील दुरुस्तीची कामे तातडीने करणे.
२. पिंपळा धायगुडा-लोखंडी सावरगाव -केज- मांजरसुंबा-पाटोदा-चुंबळी फाटा हा रस्ता दुहेरी वाहतुकीचा करणे. अंबाजोगाई शहरात यशवंतराव चव्हाण चौकामधे इलेव्हेटेड पादचारी मार्ग तयार करणे.
३. राष्ट्रीय महामार्ग सुरत-चेन्नई साठी संपादन करणे आवश्यक असणाऱ्या जमिनीच्या भूसंपादनाची सद्यस्थिती बाबत सविस्तर चर्चा केली.
४. रामा ५४८ माजलगाव- धारूर -केज या रस्ता कामाचा दर्जा अत्यंत खराब असल्यामुळे तेथे दररोज अपघात होत आहेत. संबंधित एजन्सी कडून तातडीने आवश्यक त्या सुधारणा करून घेण्यात याव्यात. बर्दापूर-लोखंडी सावरगाव दुहेरी रस्ता करणे बाबत निविदा प्रक्रियेला वेग द्यावा.
५. ऋपाटोदा व आष्टी तालुक्यातील पिठ्ठी-अंमळनेर-टाकळी काजी हा रस्ता तसेच गेवराई तालुक्यातील राक्षसभुवन फाटा -उमापूर- शेवगाव हे दोन्ही रस्ते राष्ट्रीय महामार्गाचा दर्जा देण्यात यावा.

## तलवाडा येथील गाव तलावाच्या भराव भिंती लगट अतिक्रमण वाढल्याने तलाव फुटन्याचा धोखा वाढला

### तलवाडा ग्रामपंचायतने अर्थिक मलिद्यासाठी गावाला संकटात टाकले : सौदागर, शिंगने

बीड । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील ग्रामपंचायतच्या मलिदा लाटु भूमिकामुळे गाव तलावाच्या भराव भिंती लगट मोठ्या प्रमाणात अतिक्रमण वाढले असुन सार्वजनिक पाणी पुरवठा करणा–या पाईप लाईनवर आतिक्रमण धारकांनी पक्के बांधकाम करुन पाणी पुरवठ्याला देखील अडथळा निर्माण केल्याने वेळेवर पाणी पुरवठा होत



नसल्याचे गावक–यांचे म्हणने असुन तलावाच्या भराव भिंतीच्या लगट वाढलेल्या आतिक्रमणमुळे तलाव फुटन्याचा धोखा वडावला आसल्यामुळे गाव व गावक–यांचे हित लक्षात घेत स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उप युवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन सौदागर व जयदेव शिंगने यांनी संबंधित प्रशासनास निवेदन दिले असुन निवेदनात म्हणटले आहे ▶▶ उर्वरित पान २ वर

## बाजीराव दादा चव्हाण यांच्या पुढाकाराने संत ज्ञानेश्वर माऊली पालखी सोहळ्यात मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन

सातारा । प्रतिनिधी

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व आध्यात्मिक परंपरेचा म ानबिंदू असलेल्या संत ज्ञानेश्वर माऊली पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर, वारकऱ्यांच्या सेवेसाठी एक महत्त्वपूर्ण उपक्रम राबवण्यात आला. युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव दादा चव्हाण यांच्या पुढाकाराने व शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष राज्यकार्यकरणी सदस्य महाराष्ट्र राज्य डॉ. सहर्ष घोलप यांच्या नेतृत्वाखाली फलटण येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे तसेच पाणी व बिस्किट वाटपाचे



आयोजन करण्यात आले. या उपक्रमासाठी प्रेरणा मिळाली ती म हाराष्ट्राचे लाडके उपमुख्यमंत्री मा. एकनाथजी शिंदे साहेब, संसदरत्न खासदार श्रीकांतजी शिंदे ▶▶ उर्वरित पान २ वर

## गावंजी कापसे यांनी निष्ठेने कर्तव्य बजावले: रणवीर पंडित

गेवराई । प्रतिनिधी

जयभवानी विद्यालयाचे मुख्य लिपिक गावंजी कापसे यांनी निष्ठेने काम करत कर्तव्य बजावले. त्याचा आम्हाला अभिमान आहे असे प्रतिपादन शारदा स्पोर्ट्स कडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांनी केले. जयभवानी विद्यालयातील मुख्य लिपिक गावंजी कापसे हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले यावेळी रणवीर पंडित बोलत होते.



गावंजी कापसे यांच्या सेवानिवृत्ती निमित्त आयोजित कार्यक्रमाला शारदा स्पोर्ट्स कडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित, जयभवानी शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी प्रमोद गोरकर, सहप्रशासनाधिकारी ▶▶ उर्वरित पान २ वर

## गोर गरिबांच्या लेकरासाठी संघर्ष करणारे मेटे साहेब- राजेंद्र आमटे

### खांडे पारगाव येथे मेटे यांच्या जयंती निमित्त अभिवादन

बीड । प्रतिनिधी

सर्व सामान्य घरातून संघर्ष करत महाराष्ट्राच्या पटलावर बीड जिल्ह्याच नाव कोरणारे बहुजन नायक लोकनेते विनायकराव मेटे यांनी महाराष्ट्रातील सर्वसामान्य गोर गरिबांच्या लेकरासाठी विविध प्रश्नांवर संघर्ष केला असे गौरव उद्गार शिवसंग्राम शेतकरी



आघाडीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र आमटे यांनी काढले. बीड तालुक्यातील खांडे पारगाव येथे माजी आ. विनायक मेटे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित ▶▶ उर्वरित पान २ वर

## चकलांबा येथील रघुनाथराव घाडगे यांचे निधन



चकलांबा । प्रतिनिधी

चकलांबा येथील प्रतिष्ठित नागरिक व ग्रामदैवत श्री रोकडेश्वर महाराज या नावाने असलेल्या श्री रोकडेश्वर सांप्रदायिक भजनी मंडळाचे सर्वेसर्वा श्री. रघुनाथराव त्रिंबकराव घाडगे यांचे काल दि.२९जुन २०२५ रविवारी रोजी सायंकाळी पाचच्या सुमारास चकलांबा येथील राहत्या घरी दुःखद निधन झाले .मृत्यू समय त्यांचे वय ८४ वर्षे होते. काल सायंकाळी १० च्या सुमारास त्यांच्यावरती चकलांबा येथेच अंतिम संस्कार ▶▶ उर्वरित पान २ वर

## मुलीवरील कोचिंग क्लासेस मधील पीडितेवर झालेला लैंगिक अत्याचार प्रकरणातील तपास आय पी एस महिला अधिकारी यांच्याकडे देण्यात यावा : ॲड संगीता धसे



बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील उमाकिरण कोचिंग क्लासेस मध्ये पीडितेवर झालेल्या लैंगिक अत्याचार प्रकरणांमध्ये आरोपी विजय पवार आणि प्रशांत खटावकर या दोघांना अटक केलेला असून सदर तपास हा बीड शहर पिंक पथकाकडे आहे सदर तपासा मधल्या काही त्रुटी पाहता आरोपीशी संगम मत तर झालं नाही ना असा प्रश्न निर्माण होतो ...सदर आरोपीला अटक असतानाही त्याला बेड्या न घालणं, त्याची सीसीटीव्ही फुटेज तपासून आरोपी सोबत असणाऱ्या साथीदारांचे सुद्धा सीडीआर तपासून त्यांना या गुन्ह्यांमध्ये सह आरोपी करणे ,अजून कित्येक मुलींना कोचिंग क्लासेस मधील याच शिक्षकांनी लैंगिक त्रास दिला त्या लैंगिक त्रासातील मुलींचे गुप्त जवाब घेणे, या क्लासेस मध्ये अशा पद्धतीचे एखादा रॅकेट तर चालू नाही ना याबाबत सर्व चौकशी करणे या सर्व बाबींचा विचार करण्यासाठी व त्या केसा योग्य तपास होण्यासाठी सदर तपास ▶▶ उर्वरित पान २ वर

## बीड जिल्ह्यातील कंत्राटी कामगारांना त्यांचे मूलभूत अधिकार द्या अन्यथा अर्धनग्न सत्याग्रह करणार: भाई राजेशकुमार जोगदंड

बीड । प्रतिनिधी



बीड जिल्ह्यातील सर्व नगरपरिषद व नगरपंचायत आस्थापनेतील कंत्राटी कामगार पुरवठा करणारे कंत्राटदार कंत्राटी कामगारांना महाराष्ट्र शासन नगरपरिषद प्रशासन संचालनालय नवी मुंबई यांनी निर्गमित केलेल्या परिपत्रकाची काटेकोरपणे अंमलबजावणी करून कंत्राटी कामगारांना त्यांचे मूलभूत अधिकार द्या अन्यथा ३० जून २०२५ रोजी अर्ध नग्न सत्याग्रह रोजंदारी मजदुर सेना केंद्रीय महासचिव भाई गौतम आगळे सर यांच्या नेतृत्वात होणार आहे .

याबाबत सविस्तर वृत्त असे की जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात मा. मनोज रानडे आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय नवी मुंबई यांचे आदेश क्रमांक नपप्रसं/२०२४/ सर्व न.प.कंत्राटी कर्मचारी/ कक्ष – ६ / ५०६६ दिनांक:– २६.०८.२०२४. ची काटेकर पणे अंमलबजावणी करण्यासाठी मा.जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १३/५/२०२५ रोजी संयुक्त बैठक घेण्यात आली त्याचे इतिवृत्त दिनांक २३ मे २०२५ रोजी जिल्ह्यातील सर्व मुख्याधिकारी नगरपरिषद नगरपंचायत यांना पाठवून त्यांच्याकडून कंत्राटी कामगार यांना देण्यात येत असलेल्या वेतनाबाबत चा व इतर सोयी सुविधांचा वस्तुनिष्ठ अहवाल मागून घेण्याचे निर्देश जिल्हा सह आयुक्त नगरपरिषद प्रशासन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय बीड यांना दिलेत. *कंत्राटी कामगारांचे प्रलंबित प्रश्न पुढीलप्रमाणे* उद्योग,ऊर्जा, कामगार व खनि कर्म विभाग मंत्रालय, मुंबई यांची अधिसूचना दिनांक २४ फेब्रुवारी २०१५ व ६ मार्च २०२५ रोजी स्थानिक स्वराज्य संस्था ग्रामपंचायती वगळून या रोजगारात असलेल्या कंत्राटी कामगारांचे किमान वेतन पुनर्निर्धारित केले, त्याप्रमाणे वेतन दर महिन्याच्या १० तारखेच्या आत देण्यात यावे, किमान पगार आणि प्रत्यक्षात मिळालेला पगार यामधील फरक त्याच्या फरकाच्या दहापटीपर्यंत नुकसान भरपाई देण्यात यावी, कंत्राटी कामगारांना कर्मचारी भविष्य निर्वाह निधीचा यु.एन.ए. नंबर देऊन मागील अनेक वर्षापासून कर्मचारी भविष्य निर्वाह निधीची थकीत रक्कम कंत्राटी कामगारांच्या बँक खात्यात जमा करावी, कंत्राटदारांनी दर ०६ महिन्यात कंत्राटी काम ▶▶ उर्वरित पान २ वर

